## विद्यार्थी व पालकांनी व जामीनदार यांनी द्यावयाचे बंधपत्र

(टिप-निवडीनंतर सादर करावयाचे आहे)

(रु. 500/- च्या स्टॅम पेपर वर करणे)

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या प्रवर्गातील मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी "महाराजा सयाजीराव गायकवाड- सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजनेसाठीचे (सन २०२५-२०२६) बंधपत्र-

मी (१)------------------------------------------------------------------ वय ------------------- राहणार ------------------------ ------------------------------------------------------------------ (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह) ---------------------------------------- ------------------------

(२) विद्यार्थ्याच्या पालकाचे नांव ------------------------------------------------------------------ वय----राहणार ------------------ ------------------------------------------------------------------------ (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह) ---------------------------------- ------------------------------------

(३) जामीनदाराचे नांव------------------------------------------------------------- वय---------राहणार ------------------------- -------------------------------------------------- संपूर्ण पत्ता दूरध्वनी सहा --------------------------------------------------- -------------------------------------------------------

१. मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो / करते व हमी देतो ते येणे प्रमाणे,

२. (विद्यार्थी) ___________________ (वर्ष नमूद करावे) सन _________वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी (देशाचे नांव) ___________________ येथील ______________ (विद्यापीठ / शिक्षण संस्थेचे नाव व पत्ता) _____________________________________ येथे (अभ्यासक्रमाचे नांव) _________________________ साठी प्रवेश घेतला आहे.

३. (पालकांचे नाव) ________________________________ (विद्यार्थ्याचे नाव) _______________________ हया विद्यार्थ्यांचा _________________________ (नाते) आहे. यांना एकूण _____________ मुले _____________________ मुली असून यापैकी आता पर्यंत कोणीही या योजनेचा लाभ घेतलेला नाही.

४. आम्ही जामीनदार मिळून अशी हमी देतो की, परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेताना ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मंजूर होईल तो अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी श्री /कुमारी__________________________________ याची राहील. तथापी त्याने/तिने अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनामार्फत खर्च करण्यात आलेली शिष्यवृत्तीची संपूर्ण वसूल पात्र रक्कमेस आम्ही जबाबदार राहू व ती रक्कम शासनास परत करण्याचे बंधन आमच्यावर राहील. शासन निर्णय २०/०७/२०२३ यात नमूद केल्यानुसार १५% व्याजाने वसूल करण्यात येईल. सदर कुंटुंबाला आम्ही जामीनदार-----------------वर्षे ओळखतो. सदर विद्यार्थ्याने उत्पन्नाबाबत दिलेली सर्व माहिती अचूक व सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळल्यास प्रचलित कायद्यानुसार शासनाची दिशाभूल करुन फसवणूक करणेबाबत त्याच्या विरुध्द फौजदारी कार्यवाही करण्यात येईल याची मला जाणीव आहे. सदर माहिती खोटी आढळल्यास नियमानुसार कारवाईस पात्र असेन.

५.आम्ही जामीनदार हमी देतो की, (विद्यार्थ्याचे नाव)_____________________________याने/हिने अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पुढील तीन महिन्याच्या आत अंतिम परीक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्र व्यवस्थापकीय संचालक, सारथी पुणे यांना सादर करण्याची तसेच भारतात परत येऊन देशाची सेवा करणे व तिच्या/त्याच्या ज्ञानाचा फायदा देशाला करुन देण्याचीही हमी देत आहे.

7. आम्ही याव्दारे कळवितो की, (विद्यार्थ्याचे नाव) ______________________________यांच्या पालकांचे कुटुंबाचे व विद्यार्थी/विद्यार्थीनी नोकरी करीत असल्यास) श्री / कुमारी ________________________________ (विद्यार्थ्याचे नांव) याचे सन २०२५-२६ या वर्षाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये आठ लाख पेक्षा जास्त नाही. तथापी सदरची माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास आम्ही प्रचलित कायद्या नुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहू.

8. पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका किंवा पी.एच.डी अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेला कालावधी किंवा सदर अभ्यासक्रम त्यापुर्वी झाल्यास जो कालावधी लागेल या दोघांपैकी जो कमी आहे त्या कालावधीपुरतेच परदेशात राहण्यास विद्यार्थ्याला परवानगी असेल या आवश्यक कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरीता परेदशात राहण्यास विद्यार्थ्याला परवानगी मिळणार नाही हे मला मान्य आहे.

10. शासनाकडून शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी परदेशातील शैक्षणिक संस्था/विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येकवेळी उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असून तसेच शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका व प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यांसाठी सारथी कार्यालय सादर करणयात येईल.

11. प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificates), खर्चाच्या पावत्या (Receipts) इत्यादी विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांकडुन प्रमाणित करुन सारथी कार्यालय सादर करण्यात येईल.

12. महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाचा शासन निर्णय क्रमांक: सारथी २०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई-४०००३२. दि. २० जुलै २०२३ मधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच सारथी संस्थेने वेळोवेळी दिलेल्या सूचना मान्य असतील व सारथी संस्थेने / शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश / सूचना मला मान्य असतील.

13. कोणत्याही विद्यार्थ्यांनी/ उमेदवाराने खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे सिध्द झाल्यास अथवा उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कर्तव्यात कसुर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी अटकाव (Debarr) केला जाईल.

14. उपरोक्त नमूद केलेल्या सर्व बाबी मला मान्य असून त्या आम्ही वाचून व समजून घेऊन त्यावर आज दिनांक ___________ रोजी सही केली आहे. वरील बाबींपैकी कोणताही बाब खोटी व चुकीची/ बनावट आढळल्यास मी/आम्ही भारतीय दंड संविधान कलम 193 (2), 199, 200 व 406 अन्वये शिक्षेस पात्र राहील.

15. सदर शिष्यवृत्तीबाबत महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने सर्वंकष धोरणाने घेतलेला निर्णय अंतिम असून जाहिरातीमधील नमुद अटी व शर्तीमध्ये महाराष्ट्र शासनाकडून काही बदल झाल्यास त्या त्या वेळी लागू राहतील हे मला मान्य आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाचा शासन निर्णय क्रमांक: सारथी २०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई-४०००३२. दि. २० जुलै २०२३ मधील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत. तसेच सारथी संस्थेने वेळोवेळी दिलेल्या सूचना मान्य असतील व सारथी संस्थेने व शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश मला/आम्हाला मान्य असतील.

स्थळ :
दिनांक: / /२०२५

सही
(विद्यार्थी) (फोटो)
संपूर्ण नांव व पत्ता
दूरध्वनी क्र./ मो.क्रं.

सही
(पालक) (फोटो)
संपूर्ण नांव व पत्ता
दूरध्वनी क्र./ मो.क्रं.

सही
1.(जामीनदार फोटो)
संपूर्ण नांव व पत्ता
दूरध्वनी क्र./ मो.क्रं.

सही
2. (जामीनदार फोटो)
संपूर्ण नांव व पत्ता
दूरध्वनी क्र./ मो.क्रं.